# अशोक सराफांनी राष्ट्रपतींकडून पद्मश्री पुरस्कार स्वीकारला



**मुंबई–** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पुरस्कार विजेत्यांना पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आला. मराठी सिनेसृष्टीतील अभिनेते, विनोदवीर आणि अवघ्या महाराष्ट्राचे लाडके अशोक मामा म्हणजेच, अशोक सराफ यांनाही पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते अशोक सराफ यांना पद्मश्री पुरस्कारानं गौरवण्यात आलं. सध्या अशोक सराफ पद्मश्री पुरस्कार स्विकारतानाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. तो क्षण पाहून अवघ्या महाराष्ट्राची मान गर्वानं उंचावली आहे.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर अशोक सराफ यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत आभार मानले आहेत. पद्मश्री हा सन्मान माझ्या जीवनातील एक विशेष क्षण आहे. मी महाराष्ट्र शासनाचे आभार मानतो. माझ्या कुटुंबीयांचे, सहकलाकारांचे आणि प्रेक्षकांचेही आभार. तुमच्या प्रेमाशिवाय हे शक्य झालं नसतं. तुमचा प्रेम आणि आशिर्वाद कायम असाच राहू द्या, असं अशोक सराफ म्हणाले आहेत. पद्मश्री पुरस्कार स्वीकारण्याआधी अशोक सराफ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि सभागृहातील उपस्थितांना अभिवादन केलं. अशोक मामांच्या याच साधेपणानं साऱ्यांची मनं जिंकून घेतलीत. अख्खा महाराष्ट्रानं अशोक सराफांच्या पोस्टवर शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. मराठीतील दिग्गज अभिनेत्यांच्या यादीत अगदी दिमाखात समाविष्ट होणारं नाव म्हणजे, अशोक सराफ. मराठी चित्रपटांसोबत त्यांनी अनेक हिंदी चित्रपटांतही अशोक सराफ यांनी विविध भूमिका साकारल्या आहेत.

# एसटीत आता ब्लाईंड स्पॉट कॅमेरे लागणार

## संपूर्ण ३६० अंशातून निगराणी होणार

**मुंबई–** एसटी महामंडळाच्या नव्या बसेस मध्ये महिलांच्या सुरक्षेसाठी खास ब्लाइंड स्पॉट कॅमेरे बसविण्यात आले आहेत. यामुळे हे कॅमेरे ३६० अंशातून निगराणी करणार आहेत. त्यामुळे एसटीच्या येणाऱ्या नवीन बसेस प्रवासासाठी अधिक सुरक्षित असतील असे मत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले. ते ठाण्यात एआय तंत्रज्ञानावर आधारित सुरक्षा प्रणाली बसवलेल्या स्मार्ट एसटी बसेसची पाहणी करताना बोलत होते. यावेळी त्यांच्या सोबत परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक आणि एसटीचे अधिकारी उपस्थित होते

मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले की, सध्या दररोज सरासरी ५५ लाख प्रवाशांना दळणवळण सेवा देणारी एसटी भविष्यात अधिक सुरक्षित झाली पाहिजे, या उद्देशाने एआय तंत्रज्ञानावर आधारित एकात्मिक सुरक्षा प्रणाली नव्या बसेस ना बसविण्यात येणार आहे. चालकाच्या बस चालवण्याच्या पद्धतीपासून बसमध्ये बसलेल्या प्रवाशांच्या हालचालीवर देखरेख करणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेरा बरोबरच मनोरंजनासाठी वायफाय, जाहिरात प्रसारासाठी एलईडी स्क्रीन, तसेच जीपीएस प्रणाली सह फोम बेस आग प्रतिबंधक प्रणाली देखील बसविण्यात येणार आहे. या स्मार्ट बसेस बनवण्यासाठी एसटी महामंडळाचे अध्यक्ष आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक हे आग्रही होते. त्यांच्या सातत्य पुर्ण प्रयत्नांचे कौतुक करावं तितकेच थोडंच आहे असेही एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. कारण त्यांनी भविष्याचा विचार करून एसटीमध्ये आमुलाग्र बदल करण्याचा ध्यास घेतला आहे. त्यांच्या प्रयत्नाला महाराष्ट्र शासनाची योग्य ती साथ लाभेल याची मी यावेळी ग्वाही देतो असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

# अष्टविनायक मंदिरांचा होणार जीर्णोद्धार

## नियोजन विभागाकडून १४८ कोटी खर्चास मान्यता

**मुंबई (प्रतिनिधी)–** देशभरातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या राज्यातील अष्टविनायक मंदिरांच्या जीर्णोद्धाराच्या मार्ग मोकळा झाला आहे. वित्त आणि नियोजन विभागाने १४७ कोटी ८१ लाख रुपये खर्चाच्या 'अष्टविनायक गणपती मंदिरांचा जीर्णोद्धार आणि विकास आराखड्या'स सुधारित प्रशासकीय मान्यता दिली असून त्यासंबंधीचा शासन निर्णय बुधवारी जारी करण्यात आला आहे. या निर्णयात लेण्याद्री गिरिजात्मज मंदिराचा समावेश नाही.

अष्टविनायक विकास आराखड्यामुळे अष्टविनायक मंदिरांचा जीर्णोद्धार तसेच परिसराचा विकास होणार असून देवस्थानांना भेट देणाऱ्या भाविकांना, पर्यटकांना पायाभूत, नागरी सुविधा उपलब्ध होणार आहेत. अष्टविनायक क्षेत्रांच्या विकासामुळे राज्यातील आध्यात्मिक पर्यटनाला गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

अष्टविनायक मंदिरांचा जीर्णोद्धार आणि विकास आराखड्यास गती देण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार सातत्याने प्रयत्नशील होते. त्यांच्या प्रयत्नांमुळे यासंबधीच्या प्रस्तावाला मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीच्या माध्यमातून ६ मे २०२५ रोजी चौंडी (जि. अहिल्यानगर) येथे झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता घेण्यात आली. अष्टविनायक मंदिर विकासाचा आराखडा २०२१-२२ मध्ये तयार करण्यात आला होता. त्यावेळी तो आराखडा ९२ कोटी १९ लाख रुपयांचा होता. तर २०२४ मध्ये १४७ कोटी ८१ लाख रुपयांचा सुधारित प्रस्ताव तयार करण्यात आला होता. त्यास काल सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

**अष्टविनायक विकास आराखड्यातील एकूण**

१४७ कोटी ८१ लाख रुपयांपैकी १०० कोटी ५३ लाख रुपये मंदिर जीर्णोद्धार, परिसर विकासावर तर विद्युतीकरण, रोषणाई, वास्तूविशारद, जीएसटी आदींवर ४७ कोटी ३९ लाख रुपयांचा खर्च करण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील नियोजन विभागाने सुधारित प्रशासकीय मान्यता दिल्यामुळे अष्टविनायक क्षेत्राच्या विकासाला गती मिळणार असून त्याबद्दल भाविकांकडून, नागरिकांकडून आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

# १८६५ कोटींचा तुळजाभवानी तीर्थक्षेत्र विकास आराखडा

**मुंबई–** महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीजींचे तीर्थक्षेत्र असलेल्या श्री क्षेत्र तुळजाभवानी मंदिर विकास आराखड्यावर राज्य सरकारने मोहर उमटवली आहे. एकूण १,८६५ कोटी रुपयांचा हा भव्य प्रकल्प मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने मंजूर केला आहे. काल या विकास आराखड्याच्या अनुषंगाने नियोजन विभागाकडून प्रशासकीय मान्यतेचा शासन निर्णय जारी करण्यात आला असल्याने चालू आर्थिक वर्षापासूनच त्याची अंमलबजावणीही सुरू होणार आहे.

राज्य शासनाच्या नियोजन विभागामार्फत याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्याअंतर्गत मंदिर परिसराचा सर्वांगीण विकास साधण्यात येणार आहे. तीर्थक्षेत्र विकास आराखड्यामध्ये मुख्य दर्शन मंडप व तेथील अनुषंगिक सुविधा,श्री तुळजाभवानी माता छत्रपती शिवाजी महाराजांना तलवार देतानाचा १०८ फुटाचा पुतळा, घाटशिळ, महामार्गाजवळील सोलापूर बायपास पट्ट्यामध्ये व हडको येथे भक्तनिवास, प्रसादालय,पुस्तकालय, भोजनालय, भाविक सुविधा केंद्र,वाहनतळ तयार करणे. वृंदावन गार्डनप्रमाणे आधुनिक उद्यान, वृध्द व दिव्यांगाकरिता लिफ्ट, ट्रॅव्हलेटर आदी बाबींचा अंतर्भाव करण्यात आला आहे. ६ मे रोजी चौंडी येथे पार पडलेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली तुळजाभवानी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास अंतिम मान्यता देण्यात आली होती.

# धनगरवाडीच्या उपसरपंचपदी शिवानी राशीनकर

**धनगरवाडी (वार्ताहर)–** राहाता तालुक्यातील धनगरवाडी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी शिवानी गणेश राशिनकर यांची सर्वानुमते निवड झाली आहे.



उपसरपंच साहेबराव आदमने यांनी राजीनामा दिल्याने उपसरपंच पद रिक्त झाले होते. या पदासाठी शिवानी राशिनकर यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी अध्यक्षस्थानी सरपंच गोपीनाथ खरात होते. निवडणूक अधिकारी म्हणून ग्रामसेविका सरला कहार यांनी काम पाहिले निवडीच्यावेळी सदस्य साहेबराव आदमाने, अशोक रक्टे, मीनाताई रक्टे, तसेच तंटामुक्तीचे अध्यक्ष अनिल रक्टे, उपाध्यक्ष रामभाऊ रक्टे, रंगनाथ राशिनकर, राजेंद्र रक्टे, शिवाजी राशिनकर अनिल रक्टे, कारभारी रक्टे, विलास रक्टे, संजय राशिनकर, गणेश राशिनकर व ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. मावळते उपसरपंच साहेबराव आदमाने यांनी उपसरपंच शिवानी राशिनकर यांना शुभेच्छा दिल्या.

# तीन दिवसानंतर अस्तगावचा वीजपुरवठा सुरळीत

## विजेच्या खांबावर पडली होती वीज

**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** तालुक्यातील अस्तगाव येथे वीज वितरण कंपनीच्या खांबावर तीन ठिकाणी वीज पडल्याने तब्बल तीन दिवसानंतर वीज पुरवठा सुरळीत झाला.

अस्तगाव येथील वीज उपकेंद्रजवळ अमित इंजिनिअरिंगच्या बाजूला तसेच नळे वस्तीजवळ खांबावर वीज पडली. त्यामुळे अस्तगाव भागातील वीज पुरवठा खंडित झाला. वीज पडल्याने बहुतांशी खांबावरील इन्सुलेटेड कप फुटले. त्यामुळे वीज वितरण कंपनीचे कर्मचारी गेल्या दोन दिवसापासून दुरुस्तीचे काम सुरू होते. मात्र तरीही वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना खांबावरील फॉल्ट लवकर निघत नसल्याने गेल्या तीन दिवसापासून अस्तगाव भागातील ग्राहकांची गैरसोय झाली.

पुरवठा खंडित असल्याने पिण्याचे पाण्याचा प्रश्न, घरातील फॅन सुरू न झाल्याने उकाड्याने नागरिक हैराण झाले होते. तसेच अंधाराचे साम्राज्य पसरले होते. घरातील तसेच दुकानातील इन्व्हर्टर बॅटऱ्या उतरल्याने तेथेही अंधाराचे साम्राज्य होते. वीज नसल्याने विद्युत पंप सुरू होउ न शकल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. दरम्यान वीज पुरवठा गेल्या तीन दिवसापासून थंडीत झाला असल्याने अस्तगाव ग्रामस्थांची मोठी गैरसोय झाली. पुरवठा खंडित असल्याने विजेचे पंप सुरू झाले नाहीत. त्यामुळे पिण्याचे पाण्याचा प्रश्न, घरातील फॅन सुरू न झाल्याने उकाड्याने नागरिक हैराण झाले होते. तसेच अंधाराचे साम्राज्य परिसरात पसरले होते. घरातील तसेच दुकानातील इन्व्हर्टर बॅटऱ्या उतरल्याने तेथेही अंधाराचे साम्राज्य होते. वीज नसल्याने विद्युत पंप सुरू होउ न शकल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. तसेच पिठाच्या गिरण्या, कडबा कुट्टी मशिन बंद राहिले. वातावरणातील उकाडा आणि डास यांचाही त्रास ग्राहकांना सोसावा लागला.

# पान १ वरुन

## कापूस, सोयाबीन आणि ज्वारीसह १४ पिकांच्या 'एमएसपी'त वाढ

हंगामापेक्षा हे ७ हजार कोटी रुपये जास्त आहे. केंद्रीय मंत्र्यांनी सांगितले की, किमान आधारभूत किंमत पिकाच्या खर्चापेक्षा किमान ५०% जास्त असेल याची काळजी घेण्यात आली आहे.

**किमान आधारभूत किंमत किंवा एमएसपी म्हणजे काय?**

किमान आधारभूत किंमत (एमएसपी) म्हणजे शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांसाठी मिळणारा हमी भाव. जरी त्या पिकाचे भाव बाजारात कमी असले तरी. यामागील तर्क असा आहे की बाजारात पिकांच्या किमतीतील चढ-उतारांचा शेतकऱ्यांवर परिणाम होऊ नये. त्यांना किमान किंमत मिळत राहिली पाहिजे. सरकार प्रत्येक पीक हंगामापूर्वी सीएसीपी म्हणजेच कृषी खर्च आणि किंमती आयोगाच्या शिफारशीनुसार एमएसपी निश्चित करते. जर एखाद्या पिकाचे बंपर उत्पादन होत असेल आणि बाजारात त्याचे भाव कमी असतील, तर त्यांच्यासाठी एमएसपी निश्चित हमी किंमत म्हणून काम करते. एका अर्थाने, ते एका विमा पॉलिसीसारखे काम करते जे किमती घसरल्यावर शेतकऱ्यांचे संरक्षण करते.

## किसान क्रेडिट कार्ड व्याज अनुदान योजना सुरूच राहणार

शेतकरी केसीसीकडून ७% व्याजदराने ३ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज घेऊ शकतात, ज्यामध्ये बँकांना १.५% व्याज अनुदान मिळते.वेळेवर कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना ३% पर्यंत प्रोत्साहन मिळते, म्हणजेच त्यांचे व्याज फक्त ४% पर्यंत कमी केले जाते. हा लाभ पशुपालन किंवा मत्स्यपालनासाठी घेतलेल्या २ लाख रुपयांच्या मर्यादेपर्यंतच्या कर्जावर उपलब्ध आहे.

## ६८१ कोटी खर्चास प्रशासकीय मान्यता

अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणात नमूद केलेली राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय दर्जाची महत्त्वाची स्थळे, तीर्थक्षेत्रे परिसर विकास आराखडे यांची व्याप्ती आणि स्वरुप लक्षात घेऊन संबंधित आराखडे नियोजन विभागामार्फत तयार करण्यात येतात. स्थानिक पातळीवरील संबंधित आणि तज्ज्ञांशी चर्चा करुन चौंडी स्मृतीस्थळ जतन व विकास आणि त्यास लागणाऱ्या निधीचा आराखडा अहिल्यानगरच्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने तयार केला. त्यास मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीच्या माध्यमातून ६ मे २०२५ रोजी चौंडी येथे झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यानंतर दोन आठवड्यातंच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नियोजन विभागाने ६८१ कोटी ३२ लाख रुपये खर्चाच्या विकास आराखड्यास प्रशासकीय मंजुरीचा शासन निर्णय आज जारी केला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे यंदा त्रिशताब्दी जन्मवर्ष असून त्यानिमित्ताने त्यांच्या चौंडी जन्मगावी ६ मे २०२५ रोजी राज्य मंत्रिमंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार नियोजन विभागाने निश्चित वेळेत आज शासन निर्णय जारी केला. या शासन निर्णयानुसार विकास आराखड्यातील कामे करताना त्यांचे ऐतिहासिक महत्त्व, वास्तूंची मूळ शैली जपण्याचे तसेच पुरातत्वीय जाण असलेल्या व्यक्ती, संस्थांकडूनंच ही कामे करु घ्यावीत, असे निर्देश देण्यात आले आहेत. जी कामे केंद्र शासनाच्या योजना, स्वदेश दर्शन योजना किंवा अन्य योजनांमधून शक्य आहेत. ती त्या माध्यमातून पूर्ण करण्यात येणार आहेत. विकास आराखड्यातील सर्व कामे पुढील तीन वर्षात ३१ मे २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देशही शासन निर्णयात दिले आहेत.

## अतिवृष्टीमुळे नगर तालुक्यातील ४५ गावे जलमय

सुरळीत झालेला नाही. या आपत्तीच्या पार्श्वभूमीवर तहसीलदार संजय शिंदे यांनी सांगितले की, प्रशासनाने तातडीने मदतकार्य सुरू केले असून, सर्व प्रभावित गावांत पंचनामे सुरू करण्यात आले आहेत. पूरग्रस्तांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. तसेच मदतीसाठी आवश्यक यंत्रणांची नियुक्ती करण्यात आली आहे. नागरिकांनी सरकारकडून त्वरीत आर्थिक मदतीची मागणी केली आहे. विशेषतः शेतकरी वर्गाच्या नुकसानीचा विचार करून पीकविमा, आर्थिक अनुदान आणि पुनर्वसनाची योग्य ती मदत तातडीने मिळावी, अशी मागणी होत आहे. नगर तालुक्यातील परिस्थिती अजूनही गंभीर असून, आपत्ती व्यवस्थापन विभाग पूर्ण क्षमतेने कार्यरत आहे. प्रशासनाच्या मदतीबरोबरच सामाजिक संस्था आणि नागरिकांचेही सहकार्य अपेक्षित आहे.

## सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे

झाले आहे, असे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

काही भागांत जनावरे वाहून गेली असून, सद्यस्थितीत चाऱ्याचा मोठा तुटवडा जाणवत आहे. यावर उपाय म्हणून विखे पाटील यांनी सांगितले की, चारा उत्पादनासाठी अनुदान दिले जात होते, परंतु आता चारा निश्चित दराने खरेदी करून पुरवावा लागणार आहे. पशुसंवर्धन विभागाने जनावरांच्या हानीबाबतची माहिती गोळा करून मदतीचे प्रस्ताव तयार करावेत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.नद्यांच्या काठावर व कालव्यांच्या आसपास झालेले अतिक्रमण या आपत्तीला कारणीभूत ठरत आहेत. त्यामुळे जलसंपदा विभागाने अतिक्रमण हटवण्यासाठी कठोर उपाययोजना राबवाव्यात, अशा सूचना त्यांनी दिल्या. शहरी भागातील अतिक्रमणाबाबत महापालिकेनेही कठोर धोरण स्वीकारण्याची गरज आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

वाळकी गावातील रस्ता वाहून गेल्याने गावाचा संपर्क तुटला आहे. शेतजमीन व जनावरांचे गोठेही वाहून गेले आहेत. त्यामुळे गावातील जेष्ठ नागरिक व महिलांनी त्यांच्या व्यथा विखे पाटील यांच्यासमोर मांडल्या. या संदर्भात विखे पाटील यांनी सांगितले की, पाणी कमी झाल्यानंतर बंधारे, ओढे व नाल्यांचे प्रवाह सुरळीत करण्यासाठी भराव टाकण्यात येतील. यासाठी जलसंपदा विभागाने त्वरित काम हाती घ्यावे. कालच्या घटनेत विविध विभागांनी वेळीच उपाययोजना केल्याबद्दल समाधान व्यक्त करताना, नगर शहरातील स्लॅब कोसळून झालेला मुलीचा मृत्यू दुर्दैवी असल्याचे त्यांनी म्हटले. सर्व विभागांनी सतर्क राहून परिस्थितीवर नियंत्रण ठेवावे, अशाही सूचना त्यांनी दिल्या.

यावेळी आमदार शिवाजी कर्डिले, आमदार काशिनाथ दाते, माजी आमदार बबनराव पाचपुते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा कृषी अधीक्षक सुधाकर बोराळे, पशुसंवर्धन विभागाचे डॉ. सुनिल तुंभारे तसेच जलसंपदा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## लाडक्या बहिणींसाठी २९८४ कोटी वितरीत करण्यास मान्यता

सदर योजनेंतर्गत पात्र कालावधी दरम्यान राज्यातील २१ ते ६५ या वर्षे वयोगटातील प्रत्येक पात्र विवाहित, विधवा, घटस्फोटित, परित्यक्त्या आणि निराधार महिला तसेच त्या कुटूंबातील केवळ एक अविवाहित महिलेला तिच्या स्वतःच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरणाद्वारे दरमहा रु.१,५००/- इतकी रक्कम देण्यात येते.

## पदव्युत्तर शिक्षणासाठी बंधपत्रित सेवेची अट शिथिल

प्रवेशाचा मार्ग मोकळा झाल्याचे मुश्रीफ यांनी सांगितले.

बंधपत्रित सेवांची अट २०१९-२० मधील पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशापासून लागू करण्यात आली होती. तसेच याबाबत विद्यार्थी संघटनांनी न्यायालयात याचिका दाखल केली आहे. सध्या हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयाच्या स्तरावर प्रलंबित आहे. त्यामुळे या अटीची अंमलबजावणी प्रत्यक्षात करण्यात येत नव्हती. यंदाची पदव्युत्तर पदवी प्रवेश परीक्षा ही जून महिन्यात होणार आहे. त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी बंधपत्रित सेवेच्या अटीला स्थगिती देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच बंधपत्रित सेवेसाठी आवश्यक जागा सार्वजनिक आरोग्य विभागाने उपलब्ध करून द्यावयाच्या आहेत. उपलब्ध असलेल्या जागांचा विचार करता पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम प्रवेशासाठी पदवी अभ्याक्रमानंतरची बंधपत्रित सेवा पूर्ण करण्याच्या धोरणाला तात्पुरत्या स्वरुपात स्थगिती देण्यात आली आहे.

## समन्वयातून 'आषाढी वारी' यशस्वी करा-फडणवीस

वारीच्या तयारीची माहिती सादरीकरणातून दिली. त्यानंतर प्रमुख दिंडीचे प्रतिनिधी, विश्वस्त यांनी वारीसंबंधात सूचना, अडचणी मांडल्या. त्यावेळी बोलताना फडणवीस म्हणाले, वारीचे योग्य नियोजन करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्नशील आहे. पुणे, पिंपरी चिंचवड आयुक्तांनी पालख्यांच्या स्वागतासाठी वेगळी व्यवस्था करावी. रस्त्याच्या बाजूला मंडप टाकून स्वागत करावे. मात्र पालख्यांना विलंब होवू नये, याची दक्षता घ्यावी. वारीच्या यशस्वी नियोजनासाठी आपत्ती व्यवस्थापनाने दक्ष राहावे. राज्यातील विविध भागातून पालख्या पंढरपूरला येतात. नाशिक, विदर्भ, मराठवाडा या ठिकाणाहून येणाऱ्या पालख्यांना पालखी मार्गात सोयीसुविधा देण्यासाठी नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि अमरावती विभागीय आयुक्तांनी समन्वयांनी बैठक घेवून उपाययोजना कराव्यात.

पोलीस महासंचालक यांनी पोलीस अधिकाऱ्यांशी योग्य समन्वय साधून पालख्यांच्या बंदोबस्ताची, वाहतूक, अपघात होणार नाहीत, यासंदर्भात दक्षता घ्यावी. सर्व मानाच्या पालख्यांना सेवा सुव्यवस्थित राहील याची व्यवस्था करावी. जिल्ह्याची हद्द संपल्यावर पोलीस बंदोबस्तासाठी पुढील जिल्ह्यातील पोलिसांनी अगोदरच हजर राहून कोणतीही पालखी, दिंडी पोलिसांविना राहणार नाही याची दक्षता घ्यावी, अशी सूचना फडणवीस यांनी केली. सर्व संतांच्या मानाच्या पालख्या वाखरीजवळ एकत्र येतात. राज्यभरातून शेकडो पालखी सोहळे पंढरीची वाट चालत असताना पालख्यांच्या स्वागतासाठी संत नामदेव महाराजांची पालखी वाखरी येथे येते. याठिकाणी पालख्यांच्या दर्शनासाठी प्रचंड गर्दी होते. सोलापूर जिल्हा प्रशासनाने गर्दी नियंत्रणात राहण्यासाठी योग्य नियोजन करून दक्षता घ्यावी. नामदेव महाराज यांचा ओट्याचा पुनर्विकास करावा. गर्दी लक्षात घेवून वाखरीचे विशिष्ट मॉडेल वारकरी तळ होण्यासाठी आराखडा तयार करणार असल्याचेही फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

**यावर्षीही राहणार समूह विमा, ३६ वॉटरप्रुफ मंडप**

पंढरपूर येथील वारीमध्ये दरवर्षी १५ ते २० लाख वारकरी सहभागी होतात. पंढरपूर दिंडीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांचे आजारपण, अपघात किंवा मृत्यू झाल्यास या संदर्भात संबंधितांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने मागील वर्षी 'विठ्ठल रखुमाई वारकरी विमा छत्र योजना' सुरु करण्याचा निर्णय घेतला. यावर्षीही वारीमध्ये सामील होणाऱ्या वारकऱ्यांना समूह विमा राहणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. मानाच्या पालखीमधील वारकऱ्यांना यापुढे दर्शन पास योग्य प्रमाणात वाढवून दिले जातील, असेही त्यांनी सांगितले.

**३६ वॉटरप्रुफ मंडप**

पुढील काही दिवस राज्यात पावसाचा जोर राहणार असल्याचा अंदाज असल्याने वारकऱ्यांच्या निवाऱ्यासाठी पालखी मुक्कामाच्या ठिकाणी ३६ वॉटरप्रुफ मंडपाची तयारी केली आहे. आवश्यकता भासल्यास आणखी वॉटरप्रुफ मंडप वाढविण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी बैठकीत दिली. यंदाच्या वारीमध्ये प्रयागराजच्या धर्तीवर महिलांचाही विचार करण्यात आला असून हिरकणी कक्षासह महिलांना स्नानासाठी वेगळ्या स्नानगृहांची सोय उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. या बैठकीला उपमुख्यमंत्री मंत्री एकनाथ शिंदे, ग्रामविकास मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, माढ्याचे आमदार अभिजित पाटील, मुख्य सचिव सुजाता सौनिक, विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, आध्यात्मिक आघाडीचे तुषार भोसले यांच्यासह वित्त, नियोजन, सार्वजनिक बांधकाम, नगरविकास, आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि मानाच्या १० दिंड्यांचे प्रमुख प्रतिनिधी उपस्थित होते.

## कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून व्यावसायिकाची १० कोटींची फसवणूक!

अकाउंटंन्ट म्हणून इलाईट इंटरनॅशनल या फर्ममध्ये काम करत असताना त्याने फर्मच्या अकाउंटचा युजर आयडी वापरून, फर्मच्या संपूर्ण टॅली सॉफ्टवेअर मधील व्यवहाराच्या खोट्या नोंदी दाखवल्या. त्याच्या जवळच्या व्यक्तीशी हातमिळवणी करून वेगवेगळ्या बनावट नोंदी करून कस्टम ड्युटी, इन्कम टॅक्स, इन्शुरन्स पॉलिसी, कंपनीचे सप्लायर्स अशांच्या नावाने खात्यावर पैसे ट्रान्सफर केले असे दाखवले. मात्र, सदरच्या रकमा या त्याने त्याच्या नातेवाईकांच्या व ओळखीच्या व्यक्तींच्या खात्यावर वर्ग केल्या. तसेच, मिनिस्ट्री ऑफ फायनान्स भारत सरकार यांचे बनावट पत्र तयार करून या विभागाला ४८ लाख रूपये भरणा केल्याचे दाखविले. फिर्यादीने याबाबत खात्री करून संशयित आरोपीकडे चौकशी केली असता, त्याने २४ लाख रूपये पुन्हा फर्मच्या नावे टाकले.

दरम्यान, फिर्यादीने खात्री केली असता शासनाच्या कोणत्याही खात्यावर अशा प्रकारे टॅक्स भरणा होत नसल्याचे समोर आले. त्यामुळे खोट्या नोंदी घेऊन, बनावट सहीचे पत्र बनवून फिर्यादी व शासनाची फसवणूक केल्याची व ९ कोटी ८१ लाख ६६ हजार ९५७ रूपयांचा अपहार केल्याची तक्रार पोलीस अधीक्षकांकडे करण्यात आली होती. या तक्रारीची चौकशी होऊन तोफखाना पोलीस ठाण्यात मंगळवारी रात्री गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक एम. एन. गोटला हे करत आहेत.

## पोलीस दलातील ४०० पेक्षा अधिक अंमलदारांच्या बदल्या

बदल्यांमुळे अनेक अंमलदारांना त्यांच्या पसंतीची ठिकाणे मिळाली असली तरी काहींचा हिरमोडही झाला. विशेषतः एलसीबीच्या इच्छुकांसाठी हे यंदाचे वर्षसुध्दा अपेक्षाभंगाचे ठरले आहे. बदली दरबारात पोलीस अधीक्षक घार्गे यांच्यासह अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, अप्पर पोलीस अधीक्षक (श्रीरामपूर) वैभव कुलबर्मे, पोलीस उपअधीक्षक अमोल भारती, पोलीस उपअधीक्षक (गृह) गणेश उगले आदी अधिकारी उपस्थित होते.**एलसीबी इच्छुकांचा हिरमोड**

स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) मध्ये नियुक्ती मिळविण्याची अपेक्षा अनेक अंमलदारांनी व्यक्त केली होती. गेल्या पाच वर्षांपासून एलसीबीत नवीन नियुक्त्या झाल्या नसल्याने अनेक इच्छुक अंमलदारांच्या आशा अधीक्षक घार्गे यांच्या बदल्यांच्या प्रक्रियेवर लागल्या होत्या. मात्र, यंदाच्या दरबारात कोणत्याही अंमलदाराची एलसीबीत बदली झाली नसल्याचे समजते. उलट, सध्या एलसीबीमध्ये कार्यरत असलेले आणि बदल्यायोग्य ठरलेले अंमलदारही शहराबाहेर बदली करण्यात आल्याने त्याविषयी जोरदार चर्चा पोलीस दलात सुरू आहे. सध्या एलसीबीचा कारभार संलग्न अंमलदारांवर सुरू आहे. यामुळे एलसीबीत नियुक्ती कधी मिळणार असा प्रश्न पोलीस अंमलदारांकडून उपस्थित केला जात आहे.